# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.09.2024** **वार:सोमवार**

---

1. शिक्षक आणि पालकांनी महिलांचा आदर करण्याची शिकवण मुलांना द्यावी-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन
2. राज्यात 1 लाख 17 हजार 220 कोटी रुपये गुंतवणुकीच्या चार विशाल प्रकल्पांना मान्यता; पुण्यातील इलेक्ट्रीक वाहन निर्मिती प्रकल्पाचाही समावेश
3. राज्यात आतापर्यंत सरासरीच्या 121 टक्के पाऊस, 102 टक्के क्षेत्रावर पेरण्या पूर्ण आणि
4. अवकाळी तसंच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना 307 कोटी रुपयांची मदत देण्याला राज्य शासनाची मंजूरी

**<u>राष्ट्रपती पुरस्कार</u>**

शिक्षक आणि पालकांनी मुलांना नेहमी महिलांचा आदर करण्याची शिकवण दिली पाहिजे, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. शिक्षक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या विज्ञान भवनात राष्ट्रपतींच्या हस्ते देशभरातल्या 82 शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. शिक्षण क्षेत्र सर्वसमावेशक केल्याबद्दल त्यांनी शिक्षकांचं कौतुक केलं.

राज्याच्या गडचिरोली जिल्ह्यातील मंतैया बेडके, कोल्हापूरच्या सागर बगाडे, पुण्याच्या इंग्रजीच्या प्राध्यापिका शिल्पागौरी गणपुले, रसायनशास्त्र विषयाचे प्राध्यापक श्रीनिवास होथा आणि आयटीआय प्राध्यापक विवेक चांदलिया यांना या कार्यक्रमात गौरवण्यात आलं. आदिवासी विभागात अध्यापन करणारे मंतैया बेडके यांनी आपल्या कार्याची माहिती दिली....

**<u>शिक्षक दिन</u>**

मुंबईमध्येही काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिक्षक दिन हा शिक्षकांचं समर्पण, योगदान आणि मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. अनेक क्षेत्रात महाराष्ट्र देशात सर्वात पुढे आहे. शैक्षणिक दर्जातही आपलं राज्य सर्वोत्तम व्हावं यासाठी आपण साऱ्यांनी प्रयत्न केला पाहिजे, असंही मुख्यमंत्री म्हणाले. या कार्यक्रमात 109 शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

**<u>विशाल प्रकल्प</u>**

राज्यात 1 लाख 17 हजार 220 कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित 4 विशाल प्रकल्पांना काल शासनानं मान्यता दिली. या प्रकल्पांमुळे सुमारे 29 हजार रोजगार निर्मिती होण्याचा अंदाज आहे. पुणे, पनवेल, छत्रपती संभाजी नगर आणि अमरावतीमध्ये हे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. पुण्यात 12 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा इलेक्ट्रीक वाहन निर्मिती प्रकल्प; पनवेलमध्ये 83 हजार 947 कोटी रुपये गुंतवणुकीचा सेमीकंडक्टर निर्मिती प्रकल्प; छत्रपती संभाजीनगर इथं 21 हजार 273 कोटी रुपये गुंतवणुकीचा वाहन प्रकल्प; तर अमरावती जिल्ह्यात नांदगाव इथं 188 कोटी रुपये गुंतवणूकीचा वस्त्रोद्योग प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

**<u>मंत्रिमंडळ निर्णय</u>**

राज्यातील स्वमालकीच्या 36 हजार 978 अंगणवाडी केंद्रांना सौर ऊर्जा संच देण्याचा निर्णय काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सध्याच्या पुणे-शिरुर-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा

करण्याचा निर्णयही काल घेण्यात आला. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचे निकष सुधारून विहिरी, शेततळे, वीज जोडणी आदींसाठी भरीव अनुदान देण्याचा निर्णयही काल मंत्रिमंडळानं घेतला.

**पेरण्या-मंत्रिमंडळ**

राज्यात सरासरीच्या 121 टक्के पाऊस झाला असून 102 टक्के पेरण्या झाल्या आहेत अशी माहिती कृषी विभागाने काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिली. राज्यात खरीपाचं सुमारे 142 लाख हेक्टर क्षेत्र असून 145 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. राज्यातल्या 305 तालुक्यात 100 टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला असल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

**नुकसान भरपाई-शासननिर्णय**

राज्यात गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून यंदाच्या जुलै महिन्यापर्यंतच्या कालावधीत अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत म्हणून 307 कोटी रुपयांचा निधी वितरीत करायला राज्य शासनानं मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासननिर्णय काल जारी करण्यात आला.

**चक्रधर स्वामी**

महानुभाव पंथाचे संस्थापक, थोर समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या जयंती निमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल चक्रधर स्वामीजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. राज्यात विविध ठिकाणी श्रीचक्रधर स्वामी यांच्या जयंती निमित्त विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**देवस्थान विकास**

श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या पाच देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील 8 देवस्थानांच्या सुमारे 275 कोटींच्या विकास आराखड्यांना काल मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली.

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत आहे. घराघरातही विघ्नहर्त्या गणरायाच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू असून बाजारपेठामध्ये उत्साहाचं वातावरण आहे. हा गणेशोत्सव नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीनं साजरा करावा असं आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे. महानगरपालिकेचा पर्यावरण विभाग आणि लिबर्टी अर्थवेअर आर्ट यांच्या सहकार्याने शाडू मातीच्या मूर्तीसाठी 'मूर्ती आमची, किमंत तुमची' हा उपक्रम राबवला जात आहे. घोले रस्त्यावरील कला दालनात आज आणि उद्या सकाळी दहा ते संध्याकाळी सहापर्यंत या पर्यावरणपूरक मूर्ती मिळतील असं महापालिकेनं कळवलं आहे. दरम्यान आज घराघरात हरितालिका पूजनाचा उत्साह बघायला मिळत आहे.

**रेशीमशेती**

रेशीम संचालनालयाच्यावतीनं देण्यात येणाऱ्या विभागस्तरीय रेशीम रत्न पुरस्कारांचं वितरण काल उपसंचालक महेंद्र ढवळे यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आलं. यशदा इथं आयोजित कार्यक्रमात विविध जिल्ह्यातील यशस्वी रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील अमोल चांदगुडे यांनाही हा पुरस्कार मिळाला; त्यानंतर आकाशवाणीशी बोलताना ते म्हणाले......

**कांदाविक्री**

कांद्याचे भाव सध्या वाढत असल्याच्या पार्श्र्वभूमीवर केंद्र सरकारनं प्रतिकिलो 35 रुपये या अनुदानित दरानं काल दिल्ली आणि मुंबईत कांद्याच्या किरकोळ विक्रीचा प्रारंभ केला. येत्या काही दिवसांत देशाच्या अन्य मोठ्या शहरांमध्येही याचप्रकारे अनुदानित दरानं कांदा विक्री सुरू करण्याचा विचार असल्याचं केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितलं.

**राहुल गांधी**

सांगली जिल्ह्यातील कडेगाव इथं लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांच्या हस्ते राज्यातील ज्येष्ठ नेते, माजी मंत्री दिवंगत डॉक्टर पतंगराव कदम यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण आणि त्यांच्या स्मारकाचं लोकार्पण काल करण्यात आलं. ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी उपस्थित होते.

**आरोग्यविक्रम**

आरोग्याची वारी पंढरीच्या दारी या उपक्रमाच्या दुसऱ्या वर्षी पंढरपूरच्या आषाढी वारीत यंदा 15 लाखांहून अधिक वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली. राज्य शासनाच्या या महाआरोग्य शिबिराची नोंद 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डस'मध्ये झाली आहे.

**आदिवासी-नाशिक**

आदिवासींनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या वस्तूंच्या विक्रीसाठी शबरी नॅचरल्स हा ब्रँड तयार करण्यात आला आहे; या माध्यमातून शहर, जिल्ह्यातील बाजारपेठा, मॉल्स या ठिकाणी आदिवासी वस्तूंची विक्री लवकरच सुरू करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांनी दिली. आदिवासी विकास महामंडळाची 51वी वार्षिक सर्वसाधारण सभा काल नाशिकमध्ये पार पडली. त्यावेळी ते दूरस्थ माध्यमातून बोलत होते.

**राजकोट किल्ला-न्यायालय**

राजकोट इथल्या पुतळा दुर्घटना प्रकरणातील आरोपी मूर्तीकार जयदीप आपटे आणि सल्लागार चेतन पाटील यांना 10 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्याचे आदेश सिंधुदुर्ग जिल्हा न्यायालयानं काल दिले. या दोघांनाही काल स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आलं. पाटील याला 30 ऑगस्ट रोजी कोल्हापूर इथून तर आपटेला गेल्या बुधवारी कल्याणमधून अटक करण्यात आली होती.

**हॉकी**

वरिष्ठ पुरुष गटाच्या चौथ्या हॉकी इंडिया आंतर विभागीय स्पर्धेला कालपासून पुण्यात सुरुवात झाली. गतविजेत्या पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड आणि उपविजेत्या रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघांनी स्पर्धेच्या पहिल्या दिवशी सहज विजय मिळवले. दिग्गज खेळाडूंचा भरणा असलेल्या पोलीस स्पोर्ट्स संघाला निसटता पराभव पाहावा लागला. त्यांच्याविरोधात स्टील प्लांट बोर्ड संघाने विजय नोंदवला.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.